पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०९/२०१६
दिनांक : ०३/०६/२०१६

प्रति,

मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक **०८/०६/२०१६** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०८/०६/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

दिनांक – **०८/०६/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०८/०६/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **२५/०५/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत " LMV –TRची पक्की अनुज्ञप्ती प्राप्त महिलांना किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅच प्राप्त महिलांना अर्थसहाय्य देणे " या योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी र.रु.२०००/- इतकी रक्कम ही पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील सोबत जोडलेल्या महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) ची पुर्तता करणा-या अर्जानुसारच्या पात्र महिलांना देणेकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणे व आवश्यकतेनुसार सदर योजनेत बदल दुरुस्ती करण्याचा व त्यानुसार पुढील कार्यवाही करुन लाभ देण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – १८. नगरसचिव विभाग

क्रमांक : नस/४/कावि/३०९/२०१६

दिनांक : ०३/०६/२०१६

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

**(मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्रमांक नावियो/८/कावि/२७/२०१६ दि.२०/०५/२०१६ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे १८
नागरवस्ती विकास योजना विभाग
महिला व बालकल्याण योजना

" LMV –TRची पक्की अनुज्ञप्ती प्राप्त महिलांना किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅच प्राप्त महिलांना अर्थसहाय्य देणे "

**महिला व लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष ( अटी व शर्ती )**

१. महिला/मुलीच्या नावे आधार कार्ड/आधारकार्ड काढलेबाबतची पोहोच पावती (रहिवाशी प्रत) ची स्वाक्षांकित सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
२. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.
३. वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे/नाव असलेले – आधारकार्ड/ आधारकार्ड काढलेबाबतची पोहोच पावती (रहिवाशी प्रत)/घरपट्टी (मिळकतकर) पावती/ पिंपरी चिंचवड मनपाचे झोपडपट्टीधारक म्हणून ओळखपत्र/मतदार ओळखपत्र/ विद्युत बील/टेलिफोन बील/राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक/रेशनकार्ड इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (स्वाक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ अर्जासोबत सादर करावे लागेल.
४. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक, पुराव्यार्थ मा.तहसिलदार/तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला/पिवळे/केशरी रेशनकार्डवरील र.रु.१,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न आवश्यक. त्यानुसार अर्जासोबत मा.तहसिलदार/तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला/ पिवळे/ केशरी रेशनकार्ड (स्वाक्षांकित सत्यप्रत) जोडणे आवश्यक.
५. लग्नानंतरच्या किंवा इतर कारणास्तव नाव बदलाबाबतचा पुराव्यार्थ पॅनकार्ड / लग्नपत्रिका/विवाह नोंदणी दाखला/प्रमाणपत्र/शासकीय राजपत्र / र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर केलेले नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (स्वाक्षांकित सत्यप्रत) अर्जासोबत जोडणे आवश्यक.
६. दि.०१/०४/२०१५ राजीची किंवा त्यापुढील कालावधीत प्राप्त LMV –TR च्या पक्या अनुज्ञप्तीची किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट (**Transport**) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅचची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
७. सदरचा लाभ एकदाच देणेत येईल.
८. लाभ देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त सो./ मा.आयुक्त सो. यांना राहिल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.